**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे प्रबोधन व्याख्यानमालेचे आयोजन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे प्रबोधन व्याख्यानमालेच्या चार पुष्पाचे यशस्वी आयोजनानंतर पाचव्या पुष्पाचे आयोजन दि. ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता नारायणराव राणा कला महाविद्यालय, बडनेरा येथे व सहाव्या पुष्पाचे आयोजन दि. ९ ऑक्टोबर, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, अमरावती या ठिकाणी करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेच्या पाचव्या पुष्पाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर भूषविणार असून 'ग्राम स्वच्छतेचे आद्य प्रवर्तक श्रीचक्रपाणी' या विषयावर अमरावतीच्या प्रा.डॉ. सुशिला धाबे प्रमुख वक्ते म्हणून अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. याप्रसंगी बडनेरा विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री रवि राणा यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

व्याख्यानमालेच्या सहाव्या पुष्पाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून 'श्रीचक्रधर स्वामींची श्रम प्रतिष्ठा' या विषयावर अमरावतीचे प्रा. संदीप तडस प्रमुख वक्ते म्हणून अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. याप्रसंगी स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री सोमेश्वर पुसदकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

तरी व्याख्यानमालेच्या दोनही पुष्पाला नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. अजय देशमुख, महानुभाव अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, नारायणराव राणा कला महाविद्यालय, बडनेराचे प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे व स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २७/०९/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी